MHSN090001072023

# सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.

(पीठासिन अधिकरी श्री. एस.वाय.वाकचौरे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १९/२०२३**
**निशाणी क्रमांक २० खालील आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | मधुकर तुकाराम सोनकर व इतर. | **वादी.** |
| | ***विरुध्द.*** | |
| ०१. | लता शशिकांत वाघमारे व इतर. | **प्रतिवादी.** |

**(०१).** प्रस्तुत अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**(०२).** अर्ज व त्यावर प्रतिवादीने दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**(०३).** दोन्ही बाजूंची कथने व युक्तिवाद विचारात घेता प्रस्तुत अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारात उपस्थित होतात.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

(०४). वादीचे थोडक्यात कथन असे की, वादींनी प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये सरनाम्यामध्ये तर्फे मुखत्यार धारक विक्रम मधुकर सोनकर असे नमुद झाले आहे. ते वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र तयार करताना लक्षात आले आहे. त्यामध्ये विक्रम मधुकर सोनकर ऐवजी विक्रम मधुकर चव्हाण असे नमुद करणे आवश्यक आहे. सबब, वादींनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

(०५). प्रतिवादीतर्फे वकीलांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज हा दावा दाखल केल्यानंतर ३ ते ४ वर्षांनी दाखल केलेला असलयाने तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

(०६). अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा मुळ दावा निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये मुखत्यार यांचे नाव विक्रम मधुकर सोनकर असे झाले आहे. परंतू वादी त्यामध्ये दुरुस्ती करुन सोनकर ऐवजी चव्हाण असे नमुद करण्याची परवानगी मागत आहे. अशा प्रकारे दुरुस्ती केल्याने दाव्याचा मुळ पाया बदलत नाही, तसेच प्रतिवादीचेही कोणतेही नुकसान होणार नाही हे स्पष्ट होते. यास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होणार आहे. सबब मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः-**

**(०७).** मुद्दा क्र.१ चे उत्तरादाखल वादी ही विनंतीनुसार दावा दुरुस्ती करण्यासाठी पात्र ठरला आहे. यास्तव मी मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**०१.** प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादीने अर्जात नमुद असल्याप्रमाणे मूळ दाव्यामध्ये मुदतीत दुरुस्ती करुन तात्काळ दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**०३.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

SATISH YASHWANT WAKCHAURE

Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.07 17:14:46 +0530

**तासगांव.**
दिनांक : ०७.०३.२०२६.

(एस.वाय.वाकचौरे)
सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – ०७.०३.२०२६.

न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक – ०७.०३.२०२६.

आदेश अपलोड दिनांक– ०७.०३.२०२६.